चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१३ जुलै, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# रामनगर पोलीसांची दारू तस्करांविरूध्द कार्यवाही १२ लक्ष ०३ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक १३/०७/२०१९ रोजी रामनगर येथील गुन्हे शोध पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी इनोव्हा वाहनाने पडोली मार्गे अष्टभुजा वार्डकडे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून रामनगर गुन्हे शोध पथकाने सावरकर चौक येथे सापळा रचुन मिळालेल्या माहितीच्या आधारे एका इनोव्हा वाहनास थांबवुन चौकशी करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये अवैध रित्या दारूचा साठा मिळुन आला. सदर वाहनामध्ये ५० पेटया देशी दारू किं. ५,००,०००/—रू, एक टोयोटा इनोव्हा वाहन क्र. एमएच ३१ ईए ३७५४ किं. ७,००,०००/—रू, व दोन मोबाईल फोन किं. ३,०००/—रू असा एकुण १२,०३,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्रं. ९०२/२०१९ अन्वये नोंद करण्यात आला असुन दोन आरोपी नामे १) दिलीप नारायण उराडे, २) माधव मामीड दोन्ही रा. चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास रामनगर येथील गुन्हे शोध पथक करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात रामनगर पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. हाके, यांचे नेतृत्वात पोउपनि कापडे, सफौ. सुधीर जाधव, पोहवा. मनोहर कामडी, पोना. किशोर वैरागडे, रूपेश पराते, राकेश निमगडे, विकास जुम्नाके यांनी पार पाडली.

———————————————————————————————————